# दिल्लीचा हैदराबादवर दणदणीत विजय

## मिचेल स्टार्कचे पाच विकेट्स ठरले गेमचेंजर : मॅकगर्क आणि प्लेसिस यांची ८१ धावांची भागीदारी

**विशाखापटनम्, दि. ३० :**



दिल्ली कॅपिटल्सने रोमहर्षक सामन्यात वादळी फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादवर ७ विकेट्सने मोठा शानदार विजय मिळवला आहे. सनरायझर्स हैदराबाद संघाला सर्वबाद करत दिल्लीने २५ चेंडू बाकी ठेवत विजय मिळवला. दिल्लीने सुरूवातीपासूनच सामन्यात आपला दबदबा कायम ठेवला आणि अखेरीस विजय मिळवून गतवर्षीच्या सामन्यातील पराभवाचा व्याजासकट बदला घेतला. मिचेल स्टार्कचे पाच विकेट्स आणि नंतर प्रत्येक फलंदाजाने फलंदाजीत दिलेले योगदान यामुळे दिल्लीचा संघ हा सलग दुसरा विजय मिळवण्यात यशस्वी ठरली.

अभिषेक पोरेलने १६व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी षटकार लगावत दिल्लीचा विजय निश्चित केला. यासह दिल्ली पिटल्सने यंदाच्या आयपीएलमधील सलग दुसरा विजय नोंदवला आणि गुणतालिकेत आरसीबीनंतर दुसरे स्थान गाठले आहे. दिल्लीच्या संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट फिल्डिंग करत एकापेक्षा एक अनोखे झेल टिपले आणि या क्षेत्ररक्षणाच्या आणि पहिल्या डावातील कामगिरीच्या जोरावर दिल्लीने विजयाचा पाया रचला.

सनरायझर्स हैदराबादने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीने चांगली सुरूवात केली. जेक फ्रेझर मॅकगर्क आणि फाफ डू प्लेसिस यांनी पहिल्या विकेटसाठी ८१ धावांची भागीदारी केली. तर फाफ डू प्लेसिसने २७ चेंडूत ३ चौकार आणि ३ षटकारांसह ५० धावा करत बाद झाला. याशिवाय जेक फ्रेझर मॅकगर्कने ३२ चेंडूत ४ चौकार आणि २ षटाकारांसह ३८ धावांचे योगदान दिले. यानंतर आलेल्या केएल राहुलने शमीच्या षटकात वादळी फटकेबाजी करत ३०० च्या स्ट्राईक रेटने ५ चेंडूत १५ धावा करत बाद झाला.

राहुलच्या विकेटनंतर ट्रिस्टन स्टब्स आणि अभिषेक पोरेलने संघाचा डाव सावरत विजय मिळवून देत नाबाद माघारी परतले. स्टब्सने १४ चेंडूत ३ चौकारांसह २१ धावा केल्या. तर अभिषेक पोरेल १८ चेंडूत २ चौकार आणि २ षटकार लगावत ३४ धावा करत नाबाद परतला.

सनरायझर्स हैदराबाद संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण हैदराबादचा हा निर्णय त्यांच्यावरच उलटला. हैदराबादची विस्फोटक सलामी खेळी या सामन्यात फेल ठरली. अभिषेक शर्मा पहिल्याच षटकात विचित्र पद्धतीने झेलबाद झाला.

तर पॉवरप्लेमध्येच स्टार्कने दोन षटकात हैदराबादला ३ झटके दिले. स्टार्कने ट्रॅव्हिस हेड, इशान किशन आणि नितीश रेड्डीच्या विकेट घेत हैदराबादला धक्का दिला. यानंतर अनिकेत वर्माने एकट्याने हैदराबादला १५० च्या वर पोहोचवले.

अनिकेते ४१ चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह ७४ धावांची शानदार खेळी केली. तर क्लासेन ३२ धावा करत बाद झाला. याशिवाय कोणताच फलंदाज १० धावांचा आकडाही गाठू शकला नाही. दिल्लीकडून स्टार्कने ३.४ षटकांत ३५ धावा देत ५ विकेट्स घेतले. तर कुलदीपने ४ षटकांत २२ धावा देत ३ विकेट्स घेतले. याशिवाय मोहित शर्माच्या खात्यात महत्त्वाची क्लासेनची विकेट मिळाली. यासह हैदराबादचा संघ १६३ धावा करत सर्वबाद झाला.

---

## निवडक

### हळदोणे येथे उद्या नवग्रह स्थापना सोहळा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

म्हापसा, दि. ३० : श्री साई भक्ती मंदिर साईनगर हळदोणे येथे नवग्रह स्थापना सोहळा दि. १ एप्रिल रोजी साजरा होणार आहे. त्यानिमित्त सकाळी श्री ची काकड आरती धार्मिक विधी संध्याकाळी साडेचार वाजता नवग्रह मूर्तीची रथ मिरवणूक बुधवार दि. २ रोजी सकाळी धार्मिक विधी संध्याकाळी दुपारी आरती, तिर्थप्रसाद ६ वाजता भजनाच्या कार्यक्रम संध्याकाळी आरती व तिर्थप्रसाद गुरुवार दि. ३ रोजी सकाळी काकड आरती षोडशोपचार यजमान डॉक्टर तारक आरौलकर, त्यानंतर आरती व तीर्थ प्रसाद सकाळी ९ वाजता धार्मिक विधी नंतर आरती व तीर्थप्रसाद यजमान सोनाली संदीप पेडणेकर, रमाकांत कळंगुटकर पूजा मांद्रेकर, ४ वाजता भजनाचा कार्यक्रम सध्या कळ सहा वाजता असल्याची दुपार होती संध्याकाळी साडेसहा वाजता श्री ची पालखी तीर्थ प्रसाद त्यानंतर आठ वाजता फूगडी स्पर्धा रविवार दि. ६ रोजी सकाळी धार्मिक विधी सकाळी १०.३० वाजता हरिभक्त पारायण विठ्ठल गावस यांचे कीर्तन दुपारी १२.३० वाजता श्री राम जन्म सोहळा व पाळणा गीत यजमान राजेंद्रे देवशेकर दुपारी आरती महाप्रसाद संध्याकाळी ४ वाजता श्रीची साईनगर पालखी मिरवणूक श्री ची धुपारती पावणी व तीर्थ महाप्रसाद रात्री १० वाजता श्री शेजारती व उत्सव सांगता होईल.

---

### हरमल येथे ५ एप्रिलपासून प्रीमियर लीग क्रिकेट

■ *टीम दैनिक हेराल्ड*

हरमल, दि. ३० : येथील महापुरुष स्पोर्ट्स क्लब आयोजित हरमल प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा शनिवार दि. ५ व रविवार दि. ६ एप्रिल रोजी सकाळी ९ पासून मधलावाडा भाटले मैदानावर खेळविण्यात येईल.

सदर स्पर्धा हरमल मर्यादित असून, क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या संघास रोख रु. ४० हजार व उपविजेत्या संघास रोख रु. २० हजार व अन्य वैयत्कीक बक्षिसे देण्यात येईल. अधिक माहितीसाठी सज्ञन गडेकर व अक्षय महाले यांच्याशी संपर्क साधावा असे कळविले आहे.

---

### बलराम उच्च माध्यमिक विद्यालयालाच्या बारावी परीक्षेत घवघवीत यश

■ *टीम दैनिक हेराल्ड*

आगोंद, दि. ३० : अर्धफोंड–पैंगीण येथील बलराम उच्च माध्यमिक विद्यालयाला यंदाही १२वीच्या परीक्षेतघवघवीत यश मिळाले आहे. यंदाच्या वर्षी एकूण ५१ विद्‍यार्थ्यांनी परीक्षा दिली होती त्यापैकी ४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पाच विद्यार्थी उच्च श्रेणीत, सात विद्यार्थी प्रथम श्रेणीत, १९ विद्‍यार्थी द्वितीय श्रेणीत तर १८ विद्‍यार्थी पास झाले. कला शाखेतील सुवर्णा गावकर हिने ८४% घेऊन विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला तसेच अर्चना गावकर ७९.६६% घेऊन विद्यालयात तृतीय व कला शाखेत द्वितीय तर संजना वेळीप ७२.८३% घेऊन कला शाखेत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच भारत गावकर याने ८०.१६% घेऊन वाणिज्य शाखेत प्रथम तर विद्यालयात द्वितीय क्रमांक मिळवला व रश्मी म्हाळशी हिने ७९.६६% विद्यालयात तृतीय तर वाणिज्य शाखेत द्वितीय मिळवला. मोलू गावकर याने वाणिज्य शाखेत ७४.५% घेऊन तृतीय मिळविला. बलराम उच्च माध्यमिक विद्यालयाचा वाणिज्य शाखेचा सलग ९ व्या वर्षी १००% निकाल तर एकुण विद्यालयाचा निकाल ९४% लागला आहे. विद्याथ्यांचे परीश्रम, पालकांचा पाठिंबा तसेच शिक्षक, शिक्षकेतर वर्गाचा हातभार असून काणकोणचे आमदार व गोवा विधानसभेचे सभापती तसेच बलराम शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश तवडकर यांचे मार्गदशन व बलराम निवासी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या व्यवस्थापक सविता तवडकर यांचे सहकार्य ही विद्यालयाला यश प्राप्त करण्यासाठी प्रेरणादायी ठरले. बलराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. अंकुश गावकर यांनी विद्‍यार्थ्यांचे व शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

---

### मल्लिकार्जुन उच्च माध्यमिक विद्यालयाने राखली उत्कृष्ट निकालाची परंपरा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**आगोंद, दि. ३०** : काणकोण, चारस्ता येथील विज्ञान, कला आणि वाणिज्य शाखेचे श्री मल्लिकार्जुन उच्च माध्यमिक विद्यालयाने १२वीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून, शैक्षणिक क्षेत्रातील आपली प्रतिष्ठा पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. विज्ञान शाखेत ९७%, कला शाखेत १००% यश आणि वाणिज्य शाखेत ९६% यश या उत्कृष्ट निकालांसह विद्यालयाने या परिसरात शैक्षणिक गुणवत्ता कायम राखली आहे. विज्ञान शाखेत ६१ विद्यार्थ्यांपैकी ५९ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. त्यामध्ये अनामिका कुमारी हिने ८५.६६% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. सुजल चंद्रकांत गावकर (८०.६६%) आणि कीर्ती मारुती नाईक (८०.१६%) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळवला. कला शाखेत ४६ ही सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये हर्षद रोहिदास पागी आणि दिव्या धर्मू वेळीप यांनी ८२% गुणांसह संयुक्तपणे प्रथम क्रमांक मिळवला. तर सिया कुस्त वेळीप ८१.८३% गुणांसह तिसऱ्या स्थानी राहिली. वाणिज्य शाखेत २५ पैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये निखिल लक्ष्मण वेळीप ८४.३३% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला सुनदिया शाबू राईकर ८३.८३% गुणांसह दुसऱ्या स्थानी आणि अफनान सय्यद ६४.८३% गुणांसह तिसरे स्थान मिळाले. कुमारी अनामिका हिने केवळ विज्ञान शाखेतील टॉपरच नाही तर भूगोल विषयात ९९/१०० गुण मिळवत गोव्यातील सर्वोच्च गुण मिळवण्याचा विक्रम केला आहे. या उल्लेखनीय यशामुळे संस्थेला मोठा सन्मान मिळाला आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री शांबा नाईक देसाई यांनी या उत्कृष्ट यशासाठी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे कौतुक केले आहे. हे यश आमच्या शिक्षकांचे व अधिक परिश्रम, विद्यार्थ्यांचा निर्धार आणि पालकांचा अखंड पाठिंबा यांचे प्रतिबिंब आहे. या यशाचा आम्हाला अभिमान आहे, अशी प्रतिक्रिया त्यानी व्यक्त केली आहे.

---



# पीजीएमएल किंग्जने जिंकली रमाकांत वेर्लेकर चॅम्पियन्स ट्रॉफी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ३० :** पीजीएमएल किंग्ज संघाने एमसीएल सुपरस्टार्स संघाचा अटीतटीच्या लढतीत ३ गडी व ५ चेंडू राखून पराभव करत रमाकांत वेर्लेकर चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५' जिंकली. मडगावस्थित मडगाव क्रिकेट क्लबच्या डॉ. राजेंद्र प्रसाद स्टेडियमवर हा सामना विद्युतझोतात झाला. सुनिता वेर्लेकर फाउंडेशनने या सामन्याचे आयोजन केले होते. यंदा या चॅम्पियन्स ट्रॉफीचे पाचवे वर्ष होते. पणजी जिमखाना आयोजित पणजी जिमखाना मेंबर्स लीगमधील दिग्गज खेळाडूंचा पीजीएमएल किंग्ज संघात समावेश होता. तर मडगाव क्रिकेट क्लब आयोजित मेंबर्स क्रिकेट लीगमधील आघाडीचे खेळाडी एमसीएल सुपरस्टार्स संघात होते.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना एमसीएल सुपरस्टार्सने २० षटकांत ९ बाद १४७ धावा केल्या. त्यांच्या सिद्धेश प्रभू अळवेकरने सर्वाधिक नाबाद ४० धावा जमवल्या. कर्णधार आदित्य आंगलेने २५ व अमोद बोरकरने २३ धावा केल्या. पीजीएमएल संघाकडून अजिंक्य कुडतरकर, रामनाथ गावकर व सैफ अली कराजगी यांनी प्रत्येकी २ तर हेरंब शंकर परब, ओम फडते व साजू नाईक यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

पीजीएमएल किंग्ज संघाने १९.१ षटकांत ७ गडी गमावून विजय साकार केला. एकवेळ त्यांचा संघ ३ बाद ११६ असा मार्गक्रमण करत होता. आघाडी फळीत वेदांत नाईकने २८ चेंडूंत ४० धावा केल्या. परंतु, रॉबिन डिसोझा (८), सैफ (४३ धावा, ३४ चेंडू, २ चौकार, २ षटकार)) यांना सिद्धार्थ घाणेकरने एकाच षटकात बाद करत रंगत निर्माण केली. यानंतर सिद्धेश अळवेकरने किंग्जचा कर्णधार मुख्तियार काद्री (७) व रामनाथ गावकर (०) यांच्या विकेट्स मिळविल्या. हर्षद गडेकरने दबावाखाली नाबाद २२ धावा करत पीजीएमएल किंग्जला विजयी केले. सर्वोत्तम क्षेत्ररक्षकाचा पुरस्कार रामनाथ गावकर याला प्राप्त झाला. इम्पॅक्ट प्लेयर ऑफ द गॅम हा पुरस्कार बाळकृष्ण होडारकरला देण्यात आला. सर्वोत्तम गोलंदाज पुरस्कारासाठी सिद्धार्थ घाणेकरला निवडण्यात आले. सिद्धेश अळवेकर हा सर्वोत्तम फलंदाज पुरस्काराचा मानकरी ठरला. सैफ अली कराजगी हा सामनावीर ठरला.

बक्षीस वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून भारताचे माजी क्रिकेटपटू, टी–२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक, यूएई संघाचे विद्यमान प्रशिक्षक लालचंद राजपूत उपस्थित होते. याव्यतिरिक्त एमसीसी अध्यक्ष योगेश नाईक, कपिल आंगले, सुनिता वेर्लेकर फाउंडेशनचे विश्वस्त गौतम वेर्लेकर उपस्थित होते. त्यांच्याच हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

---

# विद्यार्थ्यांनी स्वत:ची क्षमता ओळखा

## प्रा. नीलेश कोरडे : सरस्वती विद्यालयाचे स्नेहसंमेलन, बक्षीस वितरण

■ *टीम दैनिक हेराल्ड*




**सावईवेरे, दि. ३०** : विद्यार्थ्यांना विशिष्ट्य कौशल्ये आणि क्षमता विकसित करण्यासाठी मदत करणारी शिक्षण पद्धत सध्या अंमलात आली आहे. केवळ सरकारी नोकरीच्या मागे न धावता विद्यार्थ्यांनी स्वतःच्या क्षमता ओळखून स्वतःला सुधारण्याचा प्रयत्न करावा. विद्यार्थी स्वतः च आपल्या जीवनाचा शिल्पकार आहे. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी हे विद्यालय झटत आहे. याचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घेत भविष्यात योग्य मार्गक्रमण करावे.

मिथिल ढवळीकर म्हणाले की, श्री सरस्वती ज्ञान प्रसारक संस्थेने कवळे सारख्या ग्रामीण भागात पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षणाची सोय मुलांना उपलब्ध करून देत सर्व साधनसुविधांनी सुसज्ज असे शैक्षणिक संकुल निर्माण केले आहे, त्याबद्दल प्रा. नीलेश कोरडे यांनी व्यवस्थापन समितीचे कौतुक केले.

ते कवळे येथील श्री सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा फोंडा येथील राजीव गांधी कला मंदिरात बोलत होते. यावेळी ३९ वर्षांच्या प्रदीर्घ शिक्षकी पेशातून सेवानिवृत्त झालेले तियाफ सिल्वेरा यांचा तसेच ग्रंथपाल वनिता पंचवाडकर यांचा सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यास व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. नीलेश कोरडे, खास निमंत्रित मिथील ढवळीकर, श्री सरस्वती ज्ञानप्रसारक संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष रामनाथकर, उपाध्यक्ष उदय कवळेकर, सचिव जयंत कवळेकर, प्राचार्य सरिता परब, पालक – शिक्षक संघाचे अध्यक्ष महानंदू नाईक, जी.एस. आदित्या नायर उपस्थित होते.

ॲड. संतोष रामनाथकर यांनी स्वागतपर विचार मांडले. प्राचार्य सरिता परब यांनी वार्षिक अहवाल सादर केला. उर्वशी कवळेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. जयमिनी साखळकर व सर्वेश कवळेकर यांनी बक्षिसांची यादी सादर केली. यानंतर

सेवानिवृत्त शिक्षक तियाफ सिल्वेरा तसेच ग्रंथपाल वनिता पंचवाडकर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उत्कृष्ट विद्यार्थिनी प्रांजिता तिळवे , उत्कृष्ट विद्यार्थी थानु गावडे, उत्कृष्ट क्रीडापटू पुरस्कार साहिल गावडे व रेणुका गावडे यांना देण्यात आला. सूत्रनिवेदन संजना वाडीकर यांनी केले. तर शेवटी आदीत्या नायर हिने आभार मानले.

---

# राज्य ज्युडो अजिंक्यपद स्पर्धेत आरसीसी म्हापसा अव्वल

■ *टीम दैनिक हेराल्ड*







**पणजी, दि. ३० :** गोवा ज्युडो असोसिएशनने आयोजित केलेल्या राज्य ज्युडो चॅम्पियनशिपच्या स्पर्धेच्या सामने झालेल्या पहिल्या दिवशी कॅडेट, सब ज्युनियर आणि सिनियर श्रेणीतील ३०० हून अधिक ज्युडोकांनी भाग घेतल्याने या स्पर्धेला उत्साही प्रतिसाद मिळाला.

शक्ती आणि कौशल्याचे प्रदर्शन घडवताना आरसीसी म्हापसा यांनी वरिष्ठ पुरुष आणि वरिष्ठ महिला दोन्ही गटात विजय मिळवला आणि राज्याच्या ज्युडो सर्किटमध्ये त्यांचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. राज्य ज्युडो अजिंक्यपद २०२४–२५ मध्ये आम्हाला तिन्ही वयोगटात खूप चांगला प्रतिसाद मिळाला. सहभागींमध्ये उत्साह आणि स्पर्धात्मक भावना पाहून आम्हाला खूप प्रोत्साहन मिळाले. ३०० हून अधिक ज्युडोकांनी भाग घेतल्याने, या चॅम्पियनशिपने राज्यभरातील ज्युडोमध्ये वाढती आवड आणि प्रतिभा दाखवली, असे गोवा ज्युडो असोसिएशनचे सचिव कृपेश वेंगुर्लेकर म्हणाले.

या स्पर्धेचे उद्घाटन म्हापसा नगरपालिकेच्या अध्यक्ष प्रिया मिशाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहताना त्यांनी सहभागींच्या समर्पणाचे कौतुक केले आणि तरुण क्रीडा प्रतिभेला वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल गोवा ज्युडो असोसिएशनचे अभिनंदन केले.

गोवा ज्युडो असोसिएशन सर्व विजेत्यांचे आणि सहभागींचे त्यांच्या अनुकरणीय कामगिरीबद्दल मनापासून अभिनंदन केले आहे. सदर स्पर्धा गोव्यात ज्युडोच्या वाढीचा आणि राज्यातील प्रशिक्षण केंद्रे आणि क्लबमधून उदयास येणाऱ्या उल्लेखनीय प्रतिभेचा पुरावा दर्शविणारी ठरली. स्पर्धेची सांगता रविवारी उशिरा होणार आहे.

निकालांचा सारांश –

कॅडेट मुले – विजेते फोंडा आरसीसी, उपविजेता पणजी आरसीसी. कॅडेट मुली – विजेते पणजी आरसीसी, उपविजेता म्हापसा आरसीसी.ज्येष्ठ पुरुष – विजेते म्हापसा आरसीसी, उपविजेता पणजी आरसीसी.ज्येष्ठ महिला –विजेते म्हापसा आरसीसी, उपविजेता पणजी आरसीसी. सर्वोत्तम जुडोका – कॅडेट मुले – पवन पटेल (फोंडा आरसीसी). कॅडेट मुली – अफशा शेख (पणजी आरसीसी), ज्येष्ठ पुरुष – उमेश कांबळे (बांदोडा ज्युडो क्लब), ज्येष्ठ महिला – तनिष्का शिवोलकर (म्हापसा आरसीसी)

---




# विजयानंद उच्च माध्यमिक विद्यालयाच्या निकालाची परंपरा कायम

**टीम दैनिक हेराल्ड**

डिचोली, दि. ३० : गोवा शालान्त मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेत मये येथील विजयानंद उच्च माध्यमीक विद्यालयाचा निकाल ९८ टक्के लागला कला शाखेचा निकाल १०० टक्के, विज्ञान शाखेचा ९७.३ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ९६ टक्के लागला. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखत एकूण ९३ विद्यार्थी परीक्षेला होते पैकी ९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

कला शाखेत नीरजा गावकर प्रथम, प्रतीक्षा हेगडकर द्वितीय तर समृद्धी जोशी तृतीय आली. वाणिज्य शाखेत ऐश्वर्या नाईक प्रथम, साक्षी नाईक द्वितीय, साईराज कारापूरकर तृतीय तर विज्ञान शाखेत प्रथम हर्षता मालवणकर, द्वितीय तेजस मयेकर आणि विदिशा पत्रे व शुभम गणपत कळंगुटकर तृतीय आले. विजयानंद ज्ञानप्रसारक संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाने प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 207 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .